शिनशिनाकी बुबलाबू तुम क्या जानो...

रेडियोवर अनेकदा लागून सातत्याने कानावर पडलेलं लताचं हे अविस्मरणीय सोलो संगीतकार सी. रामचंद्रने दिलंय हे वेगळं सांगण्याची जराही आवश्यकता नाही. अनेकांना तर ते प्यारेलाल संतोषी या गीतकाराने लिहिलं होतं हेसुद्धा ठाऊक असण्याची दाट शक्यता आहे. मात्र या गाण्याची गाडी चित्रपटाच्या नावावर आली की मग तिथेच ठप्प होते. रेडिओचा अनाउन्सर भलेही दर खेपेस फिल्म का नाम है 'शिनशिनाकी बुबलाबू' असं सांगत असला तरी हे विचित्र नाव आणि त्याचा अर्थ दोन्हीही लक्षात राहण्याची मारामार. विश्वास ठेवा अगर ठेवू नका. पण गेल्या कित्येक वर्षात आमच्या कितीतरी रसिक मित्रांना पुन: पुन्हा या चित्रपटाचं नाव सांगूनही काही उपयोग झालेला नाही.

परवा कहरच झाला. परभणीवरून एका अतिउत्साही वाचकाचं पत्र मिळालं. तो हे सदर आवर्जून वाचत असावा. त्याने सरळच विचारणा केली- तुमच्या यादीत 'शिनशिनाकी बुबलाबू' नावाचा सिनेमा आहे काय ? नसल्यास तो दाखल करून घ्या आणि ही काय भानगड आहे त्याचा सोक्षमोक्ष लावून टाका!' त्याच्या रसिकतेला मनापासून दाद देत या खेपेस त्याच चित्रपटाचा ऊहापोह करू या!

सी. रामचंद्र, संतोषी आणि रेहाना या त्रिकुटाने एका जमान्यात रसिकांच्या दिलावर अधिराज्य केलं. शहनाई, खिडकी, सरगम असे बंपर यश मिळविणारे चित्रपट याच त्रिकुटाने दिले. 'शिनशिनाकी बुबलाबू' हा या त्रिकुटाने दिलेला अखेरचा चित्रपट होता. खरं तर नृत्य संगीताची बहारदार लयलूट करताना संतोषीने उपरोक्त चित्रपटांना दिलेला कॉमेडी टच ही त्याची खासीयत म्हणावी लागेल. मात्र 'शिनशिनाकी बुबलाबू'च्या वेळी संतोषी फसला. कारण या चित्रपटाची वेगळी कथा.

शिनशिनाकी (बेबी तबस्सूम) ही चिमुरडी मुलगी आपली आई (साधना बोस) आणि वडील (प्रभू) यांच्यासोबत आनंदाने राहत असते. चित्रपटाला आदिवासी टाइप काल्पनिक पार्श्वभूमी लाभल्यामुळे तिथला जुलमी सरदार (तिवारी) क्षुल्लकशा अपराधाबद्दल शिनशिनाकीच्या आई-वडिलांना देहदंडाची शिक्षा फर्मावतो. छोटी शिनशिनाकी त्याबद्दल सरदाराच्या पायाशी लोटांगण घालून आपल्या आई-वडिलांसाठी जीवदान मागते. पण दुष्ट सरदार आपल्या शिक्षेची अंमलबजावणी तर करतोच. पण छोट्या शिनशिनाकीला तुरुंगात डांबून टाकतो.

आपल्या नशिबाला दोष देत शिनशिनाकी तुरुंगात आयुष्य कंठू लागते. पण त्याच वेळी तिच्या बाल मनात सरदाराबद्दल तीव्र घृणा निर्माण होऊन ती आपला आई-वडिलांच्या हत्येचा सूड घ्यायचं





बॅनर : संतोषी प्रॉडक्शन. गीतकार : प्यारेलाल संतोषी, निर्माता/ दिग्द. : प्यारेलाल संतोषी, संगीत : सी. रामचंद्र.

कलाकार : रेहाना, रंजन, साधना बोस, तिवारी, वीरा, बेबी तबस्सूम, राधाकिसन, मुमताज अली.

प्रदर्शन : शुक्र. २७ जून १९५२

गीते :

१) ये खिलती कली कोई लई, टका दई टका लई... लता/ चितळकर/ कोरस
२) अरे बाबा, ये हँसी बाबा, ये खुशी बाबा... लता/ कोरस
३) हाँ बडे सुरमा बनके निकले थे... लता
४) साई रे, घर-घर में इक चोर साई, तरह तरह के चोर - लता/ कोरस
५) कुछ चुहले हो, कुछ चर्चे हो... लता/ किशोर/ कोरस
६) शिनशिनाकी बुबलाबू, दो है जिस्म एक है रुह... - लता/ चितळकर
७) तुम क्या जानो तुम्हारी यादमें हम कितना रोये... - लता.

ठरवते. तुरुंगातील प्रत्येक सकाळ तिच्या सूड घेण्याच्या शपथेने उगवत राहते. पाहता पाहता दहा वर्षे निघून जातात. आता शिनशिनाकीचं (रेहाना) देखण्या युवतीत रूपांतर झालेलं असतं. त्याच दरम्यान तिच्या आयुष्यात बुबलाबू (रंजन) हा खुशालचेंडू युवक येतो. नैराश्याने ग्रासलेल्या शिनशिनाकीच्या जीवनात प्रेमाचे चार क्षण दरवळू लागतात. बुबलाबूला ती आपला मनोदय बोलून दाखवते. तो तिला त्याबाबत सहाय्य करण्याचं वचनही देतो. सर्व तयारीनिशी ती दोघं दुष्ट सरदारावर चाल करून जातात. पण दुर्दैवाने त्यांतच त्यांचा अंत होतो.

रामानंद सागर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली 'शिनशिनाकी बुबलाबू'ची मूळ कथा नक्कीच वेधक होती. परंतु प्यारेलाल संतोषीचा ती पडद्यावर साकारताना गोंधळ उडाला. चित्रपटाचा नायक रंजन याचा मुंबईतील चित्रसृष्टीतला हा पहिलाच चित्रपट. त्या आधी त्याने मद्रासी पोशाखी पटातून चांगलीच लोकप्रियता मिळवली होती. ती लोकप्रियता कॅश करण्यासाठीच संतोषीने त्याला या चित्रपटात रेहानाचा नायक बनवलं खरं. पण चित्रपटातल्या त्याच्या मर्कट लीला कथेच्या मूळ गांभीर्याला बाधकच ठरल्या. वास्तविक चित्रपटात विनोदी नट राधाकिसन आणि मुमताज अली या दोघांचे विनोदी प्रसंग एवढे उठावदार झाले होते की, प्रेक्षकांना तेवढा रिलिफ पुरेसा होता.

संतोषी आणि सी. रामचंद्र यांच्यातही याच चित्रपटाच्या वेळी मतभेद निर्माण झाले. पण तरीही पूर्वीचे संबंध लक्षात घेऊन अण्णांनी 'शिनशिनाकी बुबलाबू' पुरता संगीतमय करून टाकला होता. लताने त्यात गायलेली 'टका दई, टका लई...'सारखी धमाल गाणी त्या काळात जरी लोकप्रिय ठरली तरी काळाच्या ओघात चिरस्मरणीय ठरलं ते 'तुम क्या जानो...' हे अजरामर सोलो.

खरं तर इथं एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. गंभीर कथा असलेले ट्रॅजिडी एन्डचे चित्रपट हा संतोषीचा प्रांत नव्हताच. कारण आधीही 'निराला'च्या वेळी संतोषी असाच फसला होता आणि तिथंही सी. रामचंद्रचं 'महफिल में चल उठी शमा...' हे एकच सोलो अबाधित राहिलं होतं. या खेपेसही असंच घडलं. शिवाय 'शिनशिनाकी बुबलाबू' या फसव्या मजेशीर नावानेही प्रेक्षकांची दिशाभूल केली होती म्हणूनच 'हाय ॲडव्हेंचर इन अ स्ट्रेंज लॅण्ड' अशी दिमाखदार जाहिरात करीत प्रदर्शित झालेला हा चित्रपट प्रत्यक्षात सुपरफ्लॉप ठरला आणि विस्मृतीत जमा झाला.

■ विजय शिंगोर्णीकर

हे पत्र व्ही. रंगनाथन यांनी मालक इंडियन एक्स्प्रेस न्यूजपेपर्स (बॉम्बे) लिमिटेड यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. लोकसत्ता कार्यालय : लालबाग इंडस्ट्रियल इस्टेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, मुंबई- ४०० ०१२. दूरध्वनी : ४७१७६७७; फॅक्स : ४७१७६५४. पुणे कार्यालय : अरोरा टॉवर्स, पुणे-४११ ००१. दूरध्वनी : ६१३१५४१ ते ४५. नागपूर कार्यालय : १, रविकुंज, अंबाझरी लेआऊट, एन. आय. टी. जलतरण तलावाजवळ, नागपूर- ४४० ०१०. दूरध्वनी : २३८०११-१२-१४-१५, फॅक्स : ०७१२-२३८००७

■ संपादक : अरुण टिकेकर*

■ सहाय्यक संपादक : दिनकर रायकर.

(*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)